# ।। होतब को अंग ।।
## मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

।। अथ होतब को अंग लिखंते ।।

।। सवईया इंद व छंद ।।

होणे की बात अहोणी नही होणी ।। लाख ऊपाय करो नर आई ।।
नारद मूनि जोगेश्वर पूरा ।। तिन का भेव बताऊँ लाई ।।
घड़ी सो पोहोर पलक न ठाड़ ।। भ्रमत जुग सो जाय बिलाई ।।
यूं होणे की बात क्हे सुखदेवजी ।। टारी टरे न किणा सूंई भांई ।।१।।

होतब म्हणजे होनहार म्हणजे भविष्यात जसे होणार असेल तशिच गोष्ट होते.न होणारी गोष्ट कधीही होणार नाही.लाख उपाय केले तरीही,न होणारी गोष्ट पूर्ण होणार नाही.बघा नारदमुनी पूर्ण योगेश्वर आहे,मी नारदाचा भेद तुम्हाला सांगतो तो नारदमुनी एक घडीभर, एक प्रहरभर तर काय,एक पळभर(क्षणभर)ही कोठेही उभा राहू शकत नाही.रात्र-दिवस त्रिलोकात फिरतच राहतो.आम्ही एक दिवसभर ही चाललो तर संध्याकाळी थकून जातो,तर हा नारदमुनी रात्रंदिवस चालत राहतो,तर थकत नसेल का?त्या रात्रं-दिवस फिरत राहणाऱ्याचे काय होत असेल,त्याच्या कष्टाची कल्पना करुन घ्या. अशाप्रकारे नारदमुनीला भ्रमण करत,करत युगांनु युग व्यतीत होवून गेले.आम्ही एक दिवस चालतो तर थकून जातो,परंतु नारदमुनी रात्र-दिवस चालत राहतो.नारद दक्ष राजाच्या शापाने एका जागी उभा राहू शकत नाही,अशी ही होनीची गोष्ट आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कोणाच्याही टाळण्याने टळत नाही.।।१।।

सूरज देवत पे सब सारे ।। आप तो भाग कासीद लीखाई ।।
चंद्र जो देव निर्मळ एस ।। धोती को दाग लग्यो तन माई ।।
समंदर नाम सायर सो मोटा ।। खारो सो नीर पीवे नही कोई ।।
युं होणे की बात क्हे सुखदेवजी ।। टारी टरे नही कीणासूं लोई ।।२।।

सूर्याला लोक सूर्यदेव म्हणतात.तो साऱ्या जगावर तापत राहतो परंतु स्वयं सूर्य रात्रं दिवस फिरतच राहतो आणि हा चंद्र असा निर्मळ देव आहे,अशा निर्मळ चंद्रमाच्या वर,गौतमच्या धोतरांचा डाग लागला असे म्हणतात,ही तर होनीची गोष्ट आहे.हा समुद्र जो आहे,तो अति विशाल आहे,त्याला सागर म्हणतात परंतु होनीमुळे त्याचे पाणी खारट होवून गेले,त्याच्या खाऱ्या पाण्याला कोणीही पित नाही,तर अशी होनीची गोष्ट कोणाच्याही टाळल्याने टळत नाही.।।२।।

शिव तो राज देवे धन पुतर ।। आप तो अंग के खाख लगावे ।।
आक धतूरा भांगज पीवे ।। जुगे जुग डेरूँ सो जोय बजावे ।।
बिस्नु ले अवतार ग्रभ मे ।। मानव देहे सूं आण धराई ।।
यूं होणे की बात कहे सुखदेवजी ।। टारी टरे नही ब्होत सराई ।।३।।

शिव हा दुसऱ्यांना तर राज्य देतो,धन देतो व पुत्र देतो आणि स्वत: तर आपल्या शरीराला राख लावतो आक(मदार)आणि धतूर,भांग असे असे जहर पितो आणि डमरु वाजवतो.जो विष्णू आहे तो अवतार घेतो व कौशल्या,देवकी,रेणुका आदिंच्या गर्भात येवून मनुष्य देह धारण करतो अशी होनीची गोष्ट कोणाच्याही टाळण्याने टळत नाही. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३।।

**अब सीता को हरण पिताजी को मरणो ।। राम उचत हुवा मन माही ।।**
**जांजुळी रीष समाद अंदेसो ।। ऊठ तुळा प्रेतूं पुछ न जाही ।।**
**लव सो कूस भयो जब भारत ।। च्यारूं ही गारथ सो सुन होई ।।**
**युं होणे की बात कहे सुखदेवजी ।। टारी टरे न कीणी से आई ।।४।।**

आता या अवतारांवर कसे कसे संकट पडले,इकडे सितेचे हरण झाले आणि दुसरीकडे वडिलांचा मृत्यु,वनाचे कष्ट(राहण्यास जागा नाही,कपड्याचा जागी झाडांची साल आणि राक्षसांची भीती),ज्याचाने राम वनात उदास होवून गेले.जांजूली ऋषींच्या मनात समाधीची शंका आली,तर तो उठून तुळाधाराला विचारण्यास गेला.रामचंद्राशी लव आणि कुशचे युद्ध झाले,तर राम,लक्ष्मण,भरत,शत्रुघ्न हे चारी गारद होऊन गेले,ही तरी होनीची गोष्ट आहे, असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४।।

**होणे की बात अहोणी नही होणी ।। लाख ऊपाव करो नर आणी ।।**
**जनम्या जबे तो गीत न गाया ।। मृत्यू भई सुण रण मे प्राणी ।।**
**सेंस फुणा धर सेंस कुवावे ।। नाक मे नाथ सो आण पेराई ।।**
**युं होणे की बात कहे सुखदेवजी ।। टाळी टळे नई किणा सुंई भाई ।।५।।**

जी होणारी गोष्ट आहे,ती होईल,न होणारी गोष्ट कधीही होणार नाही,लाख उपाय करा,तरीही नाही.जेव्हा कृष्णाचा जन्म झाला,तेव्हा कोणतेही रंग राग करुन जन्मोत्सव केला नाही,(कारण त्याचे आई,वडील,वासुदेव,देवकी कंसाच्या कैदेत होते,म्हणून कृष्णाचा जन्म झाला,त्या दिवशी कोणताही उत्सव नाही केला गेला,आता कृष्ण जन्मअष्टमीला प्रत्येक गांवात,प्रत्येक मंदीरात एका गावांत दहा मंदिरे राहीली,तर या दहाही मंदीरात खोटा उत्सव करतात,परंतु खरेच कृष्णा ने जन्म घेतला,त्या दिवशी कोणता जन्मोत्सव झाला नाही)आणि कृष्णाचा मृत्यु प्रभास क्षेत्राचा युध्द भुमीमध्ये भिल्लाच्या बाणाने झाला,तेथे कृष्णाचा अंतीम संस्कार करणारा कोणी राहीला नाही.असे कालीया सापाला शेषनागासारखे हजार फण होते,असे म्हणतात,त्या हजारही फणाचे नाकात नथ टाकून, कालीयाच्या डोक्यावर कृष्णाने नाच केला,असे म्हणतात,ही तर होणीची गोष्ट कोणा कडूनही टाळल्याने टळत नाही,असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।५।।

**पांडव पाँच सती जन सूरा ।। हेमाळे जाय गळावण लागा ।।**

राम लछमण राम कुवावत ।। राकस बांध पताळा भागा ।।
पाड़ कूं ताक चल्यो हणू सूरो ।। पाव मे तीर लग्यो तब जोरे ।।
युं होणे की बात कहे सुखदेवजी ।। तीन त्रिलोकी मे मोड़ी न मोरे ।।६।।

पांची पांड्व सती होते,भक्त होते आणि शुरवीर होते,यानांही हिमालयात जाऊन गळावे लागले,असेच रामचंद्राला राक्षस अहिरावण व महीरावण बांधुन,पाताळात घेऊन पळून गेले,ही तर होणारी गोष्ट आहे आणि हनुमान द्रोणागिरी पर्वताला उचलून जेंव्हा जात होता,तेंव्हा अशा शुरवीर मारुतीच्या पायात जोराने भरतचा तीर लागला,ही तर होणारी गोष्ट आहे,तिन्ही त्रिलोकात कोणाकड्रूनही मोड्ल्याने मुड्त नाही,असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।६।।

मनोहर छंद ।।

सुणो सब ग्याणी ध्यानी अेसो कोण जाणीये । होण हार होत बस टारी हून टरे हे ।
बडे बडे भूप सो तो बादस्या बखाण कहुँ । देव दाणू राज ऋषि कसे कर मरे हे ।।
सिंगी से सरस रिख तप ध्यान जो रहे । ताही के कसर तेज ईंद्र मेघ डरे हे ।।
क्हे सुखराम यो तो होतबास जोर हे । रिषि जोगी देव सूई रती नाही टरे हे ।।७।।

सर्व ज्ञानी आणि सर्व ध्यानी ऐका,या संसारात असा कोणाला समजावे की,जो होणी आणि होणहारला टाळून देईल,होणारे कोणाकड्रूनही टळत नाही,मोठ मोठे राजे(प्रयर्वत ज्याच्या रथाच्या चाकाने बनलेले खड्डे सात समुद्र आहे आणि पृथू तसेच रावणा सारखे मोठे मोठे राजे आणि बादशहाचे(सुलेमान सारखे की,ज्यांने त्रिलोकीचे देव,पशु पक्षी, जनावर,राक्षस सर्वांना वशमध्ये करुन घेतले होते,त्याचे मी वर्णन करुन सांगतो, (दाऊद,मुसा,ईब्राहीमसारखे मी सांगतो),देव(ब्रह्मा,विष्णु,महादेवसारखे)दानव(कुबेर, भार्गव,कुंभकर्ण,जालंदर,हिरण्याक्ष,हिरण्यकश्यपू वगैरे)आणि राजऋषी(विश्वामित्रा सारखे ,दुसरी सृष्टी रचना करण्याचे सामर्थ्यवाले),असे असे कसुन मरुन गेले आणि श्रृंगी ऋषी सारखा श्रेष्ठ ऋषी त्याची तपश्या आणि ध्यान इतके जोरदार होते की,भुक लागल्यावर समोरचा झाडाला फक्त एक वेळ चाटत होते),त्यांच्या कड्क तेजाने इंद्र आणि मेघही घाबरत होते,असा ऋषी मेनकेच्या फंदात पड्ला,ही तर होणारी गोष्ट जोरदार आहे,ऋषी,योगी,देव यांच्यानेही होणारी गोष्ट गुंजभरही टाळली गेली नाही, असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।७।।

संभूसो श्राप जाय दुज सेती जाणीये ।। पुत्री संजोग भोग धुम रिष धारे हे ।।
राम से भ्रतार ताय हणू लछ पायके ।। रावण से आन ग्रेहे सीता बन हरे हे ।।
क्हे सुखराम सो तो होतबस जोर हे ।। देहे धरी दुज केई बस नही करे हे ।।८।।

महादेवाला ब्राह्मणाचे सिर(डोके)कापल्या कारणाने ब्रह्म हत्या लागली.तसेच ब्रह्माने

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

महादेवाला शाप दिला की,तुझी प्रसादी कोणी खाणार नाही आणि महादेवाने ब्रह्माला शाप दिला की,तुझी पूजा कोणी करणार नाही.धुम्र ऋषी(पराशर)ने आपल्या कन्येशी संभोग करुन भोग केला,ही पण तर होणारीच गोष्ट आहे.सीता(जानकी)जीचा रामा सारखा भ्रतार आणि लक्ष्मणासारखा रक्षक असतांनाही,सीतेला रावण पकडून वनात घेवून गेला,ही पण होणारीच गोष्ट आहे,होणारे फार जोरदार राहते,देह धारण करुन आलेले अवतार आणि द्रिज(ब्रह्मा)च्याही वंशमध्ये ही गोष्ट नाही आहे,असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।८।।

**मान से मछंद्र जोग ।। शिष ताही गोरखा ।। ग्रेहे जाय बंधे गुरू ।। जिण घर पोरखा ।।**
**नारद न्याव नेम तरण रूप पेखिये ।। साठ सुत जाये ताही ।।**
**होण हार देखिये ।। अंजनी अनोप ताही पहाड़ मध बास रे ।।**
**ग्रेहे गाँव प्रीत बिना । बंधी सुत आस रे ।। गोतम गंभीर रिष । ईंद्र बिध देखियो ।।**
**के सुखराम सो तो हुणहार सम ।। जुग कछु नही पेखियो ।।९।।**

मच्छिंद्रनाथा सोबत जसे योगी,ज्याचा गोरक्षनाथा सारखा शिष्य,असा मच्छिंद्र नाथ, स्त्रीयांचा राज्यात जाऊन बांधला गेला आणि स्त्रीच्या घरी आपला पुरुषार्थ खर्च केला,तेथून गोरक्षनाथा ने सोडवून आणले,ही तर होणारी गोष्ट,नारदमुनी न्यायाने आणि नियमाने चालणारा,तरुण स्त्रीचे रुप होवून गेला,त्या नारदीला साठ पुत्र झाले, ही होणारी गोष्ट आहे.अंजनी ही अनुप,जिला कोणाचीही उपमा दिली जात नाही,तीला तीचा पिता गौतमने तुला कुवारपणातच पुत्र होणार,असा शाप दिला होता,या शापाला घाबरुन अजंनी जेथे घर नाही,गांव नाही आणि कोणत्या पुरुषाशी प्रिती नाही,अशा पहाडत राहू लागली, तेथे तीला मारुती पुत्र झाला,ही पण होणारीच गोष्ट आहे,गौतमा सारखा गंभीर मनाचा ऋषी,याने इंद्राने केलेली विधी बघीतली,(इंद्राला हजार भग होवून गेले,तेच नंतर इंद्राचे हजार डोळे होऊन गेले.अहिल्या दगड होऊन गेली.चंद्र कोंबडा बनला.त्याला लंगोटीने मारले आणि अहिल्याला शाप दिला.ही अहिल्या अहल राजाची पुत्री होती,ती खुप रुपवान असल्या कारणाने इंद्र वगैरे,सर्व देव तीला प्राप्त करण्याची इच्छा करीत होते,परंतु अहिल्येच्या पित्याने स्वयंवर रचला की,जो कोणी पृथ्वीची प्रदक्षिणा करुन सर्व प्रथम येईल,त्याला मी अहिल्या देईन,इंद्र वगैरे सर्व देव प्रदक्षिणा करण्यास निघाले,गौतम पायाने लंगडा होता,तो गाईची प्रदक्षिणा करुन सर्वांत पहिले येऊन बसुन गेला आणि सर्व देव आणि इंद्र सर्व नंतर आले.गौतम हा इंद्राचा गुरु होता,तरीही कुवासनेने रात्री गौतमाचा घरी गेला आणि गौतमला घरातून बाहेर पाठविण्याकरीता चंद्रमाला सोबत घेतले,सकाळी कोंबड्याने बांग दिली की,गौतम गंगा स्नान करण्यास जात असे,म्हणून चंद्रमाला कोंबडा बनवून बांग लावण्यास सांगीतले,

तेव्हा गौतम रात्र थोडीशी राहून गेली,असे समजुन स्नान करण्यास गेला.त्याचा जाण्यानंतर इंद्र अहिल्येचा जवळ आला,गौतम गंगा घाटेवर गेला,तर गंगाने म्हटले की, तु आज लवकर का येवून गेला,गौतम म्हणाला की,कोंबड्याने बांग दिली म्हणजे रात्र आता राहीली नाही,असे समजून आला,तेव्हा गंगा म्हणाली की,तुझ्या घरी धोका होवून राहीला आहे,तु लवकर घरी जा,त्या गौतमाने घरी येऊन इंद्राची सर्व विधी बघीतली),ही पण होणारीच गोष्ट आहे,होणहार सारखे संसारात काहीही दिसत नाही, असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।९।।

ऊँच नीच बात सो तो हुण हार बस हे ।। मोही कूं कुजस जस बीच देर मारे हे ।।
मेरा कीया क्हा होय मे तो बोत चाऊं ।। राज पाट सुखो धाम मोख मन धारे हे ।।
रत्तीसो रिजक बात मेरे बस नाय हे ।। करणहार जोग प्रभू आप ही प्रसिध्ध हो ।।
क्हे सुखराम सो तो ज्ञान कर देखिया ।। ठाम ठाम जाग हरी सम राम आप हो।।१०।।

उच्च गोष्ट आणि निच गोष्ट हे सर्व होणहारच्या वशमध्ये आहे,मला तर मध्येच यश आणि अपयश देऊन मारतात,जे होते ते तर होणहारच्या प्रमाणे होते,माझे केलेले झाले असते तर,मी तर खुपसे राज्य चाहतो,राजसिंहासन चाहतो आणि चांगले धाम(स्थान) चाहतो आणि मोक्ष मिळेल असे मनात ठेवतो,माझ्या वश तर थोडीही रीझक नाही आणि करण्या योग्य तर प्रभु आपणच प्रसिद्ध आहेत,मी सर्व ज्ञानाने पाहीले घेतले,सर्व स्थाना स्थानावर आणि जागे जागेवर सर्वत्र आपणच रमणारे राम आहे. ।।१०।।

तुम ही क्रण हार हुण हार सांइयां ।। मन का कियास कदे होत नही कबहु ।।
ग्यान सो बिग्यान हम सारे सोझ देखिया । क्रम सो बिंधुस भ्रम भागा सरब जब हुँ ।
होणहार बात सोतो पाली नही जाय हे । जोग बिध चांवता सो होय हे बिजोग सोई
क्हे सुखराम प्रभू तुम बिन क्रणहार ।। ओर बात बिध हम देखीयो न कोई ।।११।।

हे स्वामीजी,आपणच तर करणारे आहात,आपणच होणहार आहात,मग माझे केल्याने काय होते,मनाने केलेले काय होते,मनाने केलेले तर कधीही होत नाही,मी ज्ञान आणि विज्ञान सर्व शोधून बघून घेतले,सर्व कर्माचा विध्वंस होऊन सर्व भ्रम पळून जातात, परंतु होणारी गोष्ट टाळली जात नाही,मी ज्या विधीचा योग चाहतो,तर त्या विधीचा वियोग होऊन जातो,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,प्रभूजी मी आपल्या शिवाय करणारी दुसरी गोष्ट आणि दुसरी विधी बघीतली नाही. ।।११।।

इन्द व छंद ।।

कोऊ क्हे सब राम करे हे ।। कोईस होण पदार्थ बोले ।।
कोउस जीव प्राप्त गावे ।। हात करीस सोई हर तोले ।।
राइ समेर नही कम जाफा ।। इसो प्रमाण अचकत बोले ।।

सोच बिचार कहे सुखदेवजी ।। ग्यानी हुवे सोई ओ भ्रम खोले ।।१२।।

कोणी म्हणतो,सर्व रामच करतात,करणारे रामच आहे.कोणी म्हणतो,होणहार जसे होणार, तसेच होते.कोणी म्हणतात जीवाचा कर्माचा प्रमाणाने जीवाला प्राप्त होते,जसे जीवाने हाताने कर्म केले असेल,तेच भाग्यात लिहीले जाते,की,तसेच हर त्याला भाग्याच्या प्रमाणाने तोलून देतो,त्यांच्या देण्यात सुमेर पर्वतात एक राईच्या दाण्या इतकेही कमी जास्त नाही होत,असे प्रमाण पक्के बोलतात,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कोणी ज्ञानी असेल,तोच हा भ्रम खोलेल. ।।१२।।

कुन्डल्यो ।।

नर को हूंणो लिख्यो सो मत आवे दाय ।।
प्रभाते नर ऊठ कर वा ही करे उपाय ।।
वाही करे उपाय प्रथ चूके नही काई ।।
होय पतंगो जीव पडे. दीपक के माही ।।
जले गडे सुखरामके प्रतन काची खाय ।।
ज्यूं नरको हूणो लिख्यो सो मत आवे दाय ।।१३।।

जसे मनुष्याचा भाग्यात लिहीले असेल,तिच गोष्ट त्याला पसंत पडेल.तो पहाटेच उठून भाग्यात लिहीले आहे तसा उपाय करेल,उपाय करण्या प्रती कधीही चुकणार नाही,जसे पतंगा दिव्याचा वर पडून जळून जातो,असेच जीव आपल्या कर्माचा प्रमाणे जळतात आणि गळतात,मनात बिलकुल कच्चे राहत नाही,जसे मनुष्याच्या भाग्यात लिहीले असेल, तीच मती त्याला पसंत पडेल.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१३।।

।। इति श्री होतब को अंग संपूरण ।।